**फौजदारी किरकोळ अर्ज ३५/२०२६**

MHAH210002812026

**निशाणी १ वरील आदेश**
**(औदुंबर राऊत वि. सरकार)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार याने त्याची टी.व्ही.एस कंपनीची ज्युपीटर स्कुटर त्याला परत मिळणेकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जदार याने त्याची टी.व्ही.एस कंपनीची ज्युपीटर स्कुटर तीचा नोंदणी क्रमांक एमएच–१६–डीएन–७६७१ जामखेड पोलीस स्टेशन यांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक १८/२०२६ चे तपासाकामी जप्त केलेली आहे. सदरचा मुद्देमाल पोलीस स्टेशनला पडून राहिल्यास तो खराब होण्याची शक्यता आहे. सदरचे वाहन अर्जदार याला शेतात, शहरात व इतरत्र कामधंद्याचे ठिकाणी जाणे–येणेसाठी तसेच घरगुती वापरासाठी गरजेचा आहे. अर्जदार न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे योग्य त्या रकमेचा बॉड देण्यास तयार आहे.

३. प्रस्तुत अर्जास अन्वेषण अधिकारी व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागवले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्ज खरा व बरोबर नाही. मुद्देमाल परत केल्यास पुन्हा अशा स्वरुपाचे गुन्ह्यात वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरोपी त्यामध्ये फेरबदल करु शकतो. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे. तसेच अन्वेषण अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ६ खाली दाखल केले असून त्यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा मुद्देमाल ताब्यात दिल्यास अर्जदार त्याची विक्री करु शकतात. तसेच सदर वाहनाची आवश्यकता असल्यास

अर्जदार वाहन हजर ठेवणार नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठ्यर्थ निशाणी ०३ सोबत एफ.आय.आर ची सत्यप्रत, रिमांड रिपोर्ट, अर्जदाराचे लायसन्सची सत्यप्रत, आर.सी.बुकची सत्यप्रत, आधारकार्डची सत्यप्रत, पॅनकार्डची सत्यप्रत व इन्शुरन्स पॉलीसीची सत्यप्रत दाखल केलेली आहे. प्रस्तूतच्या प्रकरणात पोलीसांनी बी.एन.एस चे कलम ३०८(५) व ३२४(५) चे गून्ह्याच्या तपासकामी अर्जदाराच्या मालकीचे वाहन जप्त केल्याचे पोलीसांच्या म्हणण्यावरून दिसून येते. अन्वेषण अधिकारी व सरकारी अभियोक्ता यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. जप्त वाहन पोलीसांच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य** या न्यायालयाच्या निर्देशानुसार, तपासकामी सहकार्य करणे व वेळोवेळी सदरील चारचाकी वाहन पोलीसांच्या तपासात हजर करणे अशी अट घालून वाहन परत करण्यास कोणतीही बाधा येत नाही. वाहन जर अनिश्चित कालावधीसाठी पोलीस ठाणे येथे पडुन राहिले तर त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. अर्जदाराने वाहन अंतरिम आदेशानुसार त्याच्या ताब्यात देण्याइतपत कागदपत्रे न्यायालयात दाखल केली आहेत व तो तसे बंधपत्र देण्यास तयार आहे. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | गुन्हा रजिष्टर क्रमांक १८/२०२६ मधील जप्त मुद्देमाल टी.व्ही.एस कंपनीची ज्युपीटर स्कुटर तीचा नोंदणी क्रमांक एमएच-१६-डीएन- |

| | |
|---|---|
| | ७६७१, चेसि क्रमांक MD626AK44R1G30412 व इंजिन क्रमांक BK4GR1114692 ही अर्जदार याने रक्कम रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) चे बंधपत्र खालील अटी शर्तीसह लिहुन दिल्यानंतर त्याचे ताब्यात देण्यात यावा. |
| अ. | अर्जदार याने न्यायालय जेव्हा निर्देशित करील तेव्हा जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करावयाचा आहे. |
| ब. | अर्जदार याने जप्त मुद्देमालात कोणताही बदल अथवा परिवर्तन करावयाचे नाही. |
| क. | अर्जदार याने जप्त मुद्देमाल सदर खटल्याचा अंतिम निकाल होईपर्यंत कोणासही विक्री, गहाण, बक्षीस करु नये अथवा मालकी हक्क हस्तांतरीत करु नये. |
| ३. | अन्वेषण अधिकारी यांनी संबंधीत मुद्देमालाचे विविध कोनांमधून रंगीत छायाचित्रे काढून व त्यावर अर्जदाराच्या सह्या घेऊन तसा पंचनामा करुन तो पंचनामा व छायाचित्र गुन्हा रजिष्टर क्रमांक १८/२०२६ चे अंतिम अहवालासोबत दाखल करावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.04.04 11:07:35 +0530

**( श्रीमती यु. ए. भोसले )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,
**जामखेड**

दिनांक- ०२/०४/२०२६
ठिकाण - जामखेड